
ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION
## RESEARCH REVIEW



CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

**20**

# सामाजिक बांधीलकी जोपासणाऱ्या कवयित्री कुसुम अलाम

डॉ. राजेंद्र ठाकरे
मराठी विभाग,
महाराजा जयाजीराव शिंदे महाविद्यालय,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर

## Research Paper - Marathi

कुसुम आलाम यांनी सामाजिक बांधिलकी जोपासून कविता लिहिल्या आहेत. आदिवासी साहित्यात उषाकिरण आत्राम, नजूबाई गावीत, पुष्पा आत्राम, कविता आत्राम इत्यादी स्त्रिया लेखन करताना दिसतात. त्यात कसुम अलाम यांचे काव्यलेखन सशक्त प्रतिभेचा अनोखा आविष्कार ठरावे असे आहे. रान आसवांचे तळें, रान पाखरांची माय हे त्यांचे गाजलेले कवितासंग्रह होत. कुसुम अलाम आपले काव्यप्रयोजन स्पष्ट करताना लिहितात.

"खरं म्हणजे कुठल्याही साहित्यात भर पडावी हा माझ्या लेखनामागचा उद्देश नाही. तर हा समाज भुकमुक्त व्हावा, जुलूममुक्त व्हावा, सामाजिक सुसंगती नांदावी, आणि आर्थिक असो, सामाजिक असो, राजकीय असो, येथील मानवता समृध्द व्हावी या धरणीवर मानवतेचे नंदनवन फुलावे. सारे जीवन सुगंधीत व्हावे असे मंगलमय स्वप्न उराशी धरुन हे माझे लिहिणे आहे" १

कुसुम अलाम यांनी काव्यलेखनाचे प्रयोजन स्पष्ट केले आहे. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी, आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी, मानवी मूल्यांची प्रस्थापना करण्यासाठी त्यांच्या कविता निर्माण झाल्या आहेत. दलित साहित्य चळवळीने साहित्यातून वेदनेचा जसा अंगार फुलविला तसाच अंगार आदिवासी कवितेमधून फुलविला पाहिजे, असे कवयित्रींना वाटते. कवितेकडे पाहाण्याची भूमिका तसेच प्रस्थापितांची कविता आणि आदिवासी कविता यात यातील फरक सांगताना कुसुम अलाम म्हणतात-

"आईने आपल्या अपत्याकडे बघावे तशी माझी कवितेकडे बघण्याची भूमिका आहे. माझी कविता अस्तित्वासाठी संघर्ष करणारी वास्तववादी कविता आहे तर प्रस्थापितांची रंजनवादी कविता आ... २



कुसुम अलाम आपल्या कवितेकडे अपत्याच्या भूमिकेतून पाहातात. सांस्कृतिक संस्काराचाही अविष्कार त्यांच्या कवितेतून व्यक्त झाला आहे. दलित व आदिवासी साहित्याच्या प्रेरणेसंदर्भात त्या लिहितात-

"आदिवासी साहित्याची खरी प्रेरणा ही आदिवासींची संस्कृती होय. त्यांची जीवन पध्दती, सहजीवनाची शैली भिन्न आहे. तरीही दलित कविता व आदिवासी कविता माणूसपण जागविणाऱ्या आहेत. माणुसकीसाठी आसुसलेल्या आहेत."३

कुसुम अलाम आदिवासी साहित्याची प्रेरणा त्यांची संस्कृती आहे असे जरी मानत असल्या तरी दलित आणि आदिवासींचे ध्येय एकच आहे असे स्पष्ट करतात. दोन्हीही प्रवाह समतेसाठी माणूस या मूल्याची प्रस्थापना करण्यासाठी निर्माण झालेले आहेत. दलित साहित्याने जसा साहित्यातून अंगार फुलवला तसाच अंगार आम्हालाही आदिवासी साहित्यातून फुलवायचा आहे असे त्या म्हणतात. डॉ. विनायक तुमराम यांच्या कवितेविषयी लिहितात-

"'रान आसवांचे तळे' हा त्यांच्या काव्यसंग्रह केवळ हौसेखातर व प्रसिध्दीखातर ही निर्मिती नाही. शतकानुशतके एकांत धारण करणाऱ्या परंतु आतल्या आत दुःखाश्रू ढाळणाऱ्या किर्र अबोल रानाची ही कैफियत आहे. .... पेटू पाहणाऱ्या रानगर्भातल्या अंधाराची ओळख म्हणजे ही कविता होय." ४

पहाडात दऱ्याखोऱ्यात अत्यंत संघर्षाचे जीवन जगणाऱ्या परंतु शिक्षणामुळे आत्मभान जागृत झालेल्या मनाचा काव्यात्मक आविष्कार म्हणजे 'रान आसवांचे तळे' होय. ही कविता रानातील अश्रू पुसण्यासाठी निर्माण झाली आहे.एवढेच नव्हे तर मूलभूत परिवर्तनासाठी ही कविता अवतरली आहे. म्हणूनच ती ऊलंगुलान करते. डॉ. यशवंत मनोहर लिहितात-

"रान आसवांच्या तळयात फक्त अश्रूच नाहीत तर या अश्रूतून फुलणाऱ्या ठिणग्या आहेत. विद्रोहाच्या ज्वालांची दाहक फुलेही त्यात आहेत. रानातील दुःखाच्या आसवांचे तळे क्रांतीसाठी पेटून उठू लागले आहे."५

रानातील दुःख आसवांचे हे तळे पेटल्याशिवाय राहाणार नाही हे डॉ. यशवंत मनोहर यांचे भाष्य आशावाद व्यक्त करणारे आहे. स्वत्वाची जाणीव जागृत झाल्यामुळे रानावनात डांबल्या गेलेल्या, गांजलेल्या मानव समूहाचे अश्रू क्रांतीची सुचकता व्यक्त करतात. कुसुम अलाम म्हणतात की स्वतंत्र भारताची फलश्रुती आदिवासींच्या दृष्टीने निराशाजनक ठरली. लाचारी पत्करुन जीवन जगणाऱ्या भुमिपुत्रांची संख्या खूप वाढली आहे. म्हणूनच अस्मितेची आग त्यांना लागत नाही. या स्वतंत्र देशात अजुनही आदिवासी कंदमुळ, किडया, मुंग्या खाऊन जीवन जगत आहे. या स्वतंत्र झालेल्या भारताला अजूनही आदिवासींची लंगोटीही बदलता आली नाही हे वास्तव कवयित्री मांडते. आदिवासींच्या वनवासिकरणाला नाकारणारी ही कविता आहे. कुसुम अलाम म्हणतात-

"मरणासन्न जगणे
वाटयास आमच्या आले
हे जाणताच मी ही
ढण्यास सज्ज झाले"

अन्यायाच्या विरोधात लढण्यास सज्ज झालेली ही नायिका आहे. प्रत्येक दीनदुबळया अंधारयात्रिकांच्या अंत:करणात ही नायिका समतेचे, आपल्या आस्मितेचे स्वप्न पेरण्यासाठी निघाली आहे. आदिवासींच्या गौरवशाली इतिहासाची ती शोध घेते. कवयित्री म्हणते-

" त्या पानापानात
शोधतेय मी, माझ्या शौर्यगाथा"

आदिवासींचा इतिहास गौरवशाली आहे. सुवर्णअक्षरांनी लिहावा असा आहे. आदिवासी हा आज अंधारयात्रिक असला तरी त्याने प्रकाशयात्रिक व्हायला हवे. विषमतेचा पुरस्कार करणाज्या मनुवादी प्रवृत्तीला त्या विरोध करतात. समतेचा त्या स्वीकार करतात. धर्मसंप्रदाय देवापेक्षाही माणसाला महान, मानणारी त्यांची कविता क्रांतदर्शी आहे. अन्यायाचा प्रतिकार हा केलाच पाहिजे असेही त्या म्हणतात. विकासाच्या नुसत्या घोषणा करणाऱ्या स्वार्थी राज्यकर्त्यांवर प्रहार करणारी ही कविता आहे. स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानंतरही मेळघाट परिसरात आदिवासींचे कुपोषण होत आहे. आदिवासींना नक्षलवादी बनवण्यासाठी प्रस्थापितांची शोषण यंत्रणाच कारणीभूत आहे असे कवयित्रींना वाटते. आदिवासी सेवक म्हणून मिरवणारे ही आदिवासी संस्कृतीची दलाली करताना पाहून त्यांचे मन दु:खी होते. पर्यावरण संवर्धनाचाही विचार त्यांची कविता मांडते.

पुरुषप्रधान व्यवस्थेत मानसिक कुचंबना झालेल्या स्त्रियांचे दु:ख कुसुम अलाम यांनी मांडले आहे. स्त्रियांनी निर्भय होऊन आपल्या शीलाचे, चारित्र्याचे रक्षण स्वत:च केले पाहिजे. स्त्रियांनी स्वाभिमानाच्या वनव्यातच आपली अस्मिता तेजाळायला हवी. स्त्रियांच्या शोषिकतेमुळे तिच्यावर अन्याय होतो म्हणून आपली अस्मिता आपणच जोपासली पाहिजे. स्त्रियांनी न्युनगंडाची भावना झटकून आपला विकास आपणच केला पाहिजे. स्त्रीची पूजा देवी म्हणून करणाज्या आणि त्याच स्त्रीला गुलामीत ठेवणाज्या पुरुषी प्रवृत्तीला विरोध करण्यासाठी कवयित्रीने आपल्या सर्खीना आपल्या अस्तित्वासाठी अस्मितेचे वाण दिले आहेत. स्त्रीनेच हे मानवी जीवन सुंदर बनवले पाहिजे. तेजस्वी स्त्रियाच हे विश्व सुंदर बनवतील असे सांगून सावित्रीबाई फुले, म. फुले यांच्या विषयी त्या आदरभाव व्यक्त करतात.

आपल्या जीवन जाणिवा आपणच प्रगल्भ करुन जगण्याचे नवे संदर्भ आपणच शोधले पाहिजेत. असे म्हणणाऱ्या कवयित्री समतेच्या युगाचे स्वप्न पाहतात. स्त्रियांची मने ही परिवर्तनशील व्हायला हवीत. तसेच स्त्री शिक्षणाचे बीज रुजवणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्याविषयीही आदराची भावना व्यक्त करताना त्या म्हणतात की-

"तू स्त्री शिक्षणाचे बीज इथे रुजवले नसतेस
तर आज माझे प्रकाशाशी जडलेले नाते
अंधारातच चाचपडत असते"

कुसुम अलाम म्हणतात-

"रानफुलांचा पाऊस अंगावर झेलीत मोठी झालेली मी रानच मायबाप, सखासोबती, सुखदु:खाचा साथी ...... पण वनवैभवाला सुरुंगाची नजर लागली आहे. बंदूक, गोळया, लाठया बरेच [illegible] घालत आहेत. पूर्वी कानात गुंजारव



करणारा वारा रडतो आहे. सारा संसार पेटतो आहे. निसर्ग रडतो आहे. ..... हिरव्या जगावर काळी छाया पसरली आहे." ६

उपरोक्त मनोगतात रानातील निर्मळ जीवन संपले आहे. पूर्वीचा संघर्ष निसर्गाच्या सान्निध्यात मूलभूत गरजा भागविण्यासाठी होता. आपल्या गरजा भागल्यावर आदिवासी जीवनातील आनंद, नृत्य, कला, गीतांच्या माध्यमातून होत असे. परंतु आजचे वास्तव वेगळे आहे. या रानवैभवाला अनेक समस्यांनी ग्रासले आहे. ठेकेदार नक्षलवादी यांनी रान पोखरुन काढले आहे. म्हणून कवयित्री म्हणतात-

"स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात
व्यथा माझी अशी आहे

छातीवर बंदूक आणि
पाठीमागे दंडूक आहे"

आजही आदिवासी असुरक्षित आहे. नक्षलवादयांच्या बंदुकाचा तो बळी ठरतो आहे. देशाचे रक्षण करणारी पोलीस यंत्रणाही आदिवासींचे शोषण करताना दिसते.

सारांश :-

कुसुम अलाम यांची कविता भुकमुक्त व जुलूममुक्त समाजाचे स्वप्न पाहाणारी आहे. मानवी मूल्यांचा ती गौरव करते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा स्वीकार त्याची कविता करते. या स्वतंत्र भारताची फलश्रूती आदिवासींच्या दृष्टीने निराशाजक आहे असे परखड भाष्य त्या करतात. आदिवासींच्या गौरवशाली इतिहासाचा त्या गौरव करतात. मनुवादी प्रवृत्तीला नाकारणारी ही कविता आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत मानसिक कुचंबना झालेल्या स्त्रियांचे दु:ख कुसुम अलाम मांडतात. नक्षलवाद व पोलीस यांच्या कात्रीत अडकलेल्या या स्वतंत्र देशातील आदिवासींचे वास्तव कुसुम अलाम मांडतात. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' हा आंबेडकरी मंत्र कवयित्रीने आदिवासींना दिला आहे. आदिवासी संस्कृतीचे प्रदर्शन मांडणाज्या आर्टगॅलज्या सजवणाज्या प्रस्थापितांच्या स्वार्थी प्रवृत्तीला कुसुम अलाम यांनी विरोध केला आहे. आदिवासींना वनवासी संबोधणाज्या प्रवृत्तीला कवयित्रीने विरोध केला आहे. आदिवासींमधील जातीयता नष्ट झाल्याशिवाय समतेचे सुंदर युग निर्माण होणार नाही हा विचारही त्यांनी मांडला आहे.

## संदर्भ सूची


१) अलाम कुसुम : मनोगत रान आसवांचे तळे, कवितासंग्रह, प्रकाशक कुसुम अलाम, प्र.आ. १९८८, पृ. २३
२) अलाम कुसुम : पत्रात्मक मुलाखत, मुलाखतकार प्रा. राजेंद्र ठाकरे दि. १७/३/२००१, पृ. ३
३) तत्रैव
४) तुमराम विनायक : रानआसवांच्या तळयाकाठी, प्रस्तावना, रानआसवांचे तळे, उनि. पृ. ०९
५) मनोहर यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन नागपूर, प्र.आ. २००१, पृ. २३२
६) अलाम कुसुम, म[illegible], रानपाखरांची मात्र, कवितासंग्रह हरिवंश प्रकाशन चंद्रपूर, प्र.आ. २१ ऑक्टो २०००, पृ. ०९